**रे.दि.अपील क्र.२४६/२०१९**
CNR - MHST01-003800-2019

**निशाणी क्र.१९ खालील आदेश**

(श्रीमती किसाबाई सखाराम सपकाळ विरुध्द विष्णु श्रीपती गुजर)

अपेलंट मयत झाल्यानंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीर माफ होऊन मिळण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे.

२) निशाणी क्र.१९ वरील अर्ज व त्यापुष्टयर्थ सादर केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. रिस्पॉन्डंटतर्फे दिलेले म्हणणे वाचले.

३) अपेलंटतर्फे कथन की, अपेलंट या दिनांक १५/०४/२०२३ रोजी मयत झाल्या परंतु त्यांचे वारस प्रकरणाकामी सामिल करणेबाबत माहिती नसलेने वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर झाला. सदर उशीर माफ होणे गरजेचे असल्याचे कथन केले आहे. रिस्पॉडंटतर्फे हरकत घेऊन उशीराबाबत संयुक्तिक कारण दिले नसल्याचा आक्षेप घेतला.

४) अपेलंटतर्फे कथनाप्रमाणे अपेलंट मयत झाल्यानंतर वारसांना रेकॉर्डवर घेणेबाबत माहिती नसलेने त्यास उशीर झाला आहे. रिस्पॉन्डंटतर्फे उशीराबाबत योग्य कारण दिले नसल्याचा आक्षेप घेतला आहे. तरी देखील अपेलंटने दिलेले कारण विचारात घेता तसेच प्रकरणाचे स्वरुप पाहता अपीलाचा गुणदोषावर निकाल होणेकरीता अर्ज मंजुर करणे उचीत होईल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारित.

**आदेश**

(१) अर्ज (निशाणी क्र.१९) मंजुर करणेत येतो.

(२) मयत अपेलंट किसाबाई सखाराम सपकाळ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला उशीर माफ करण्यात येतो.

सातारा. (नि.ह. जाधव)
दिनांक – १९/१२/२०२३. जिल्हा न्यायाधीश–४, सातारा